**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची शपथेवर साक्ष सुरू**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | नरेश माधव दळवी |
| वय | : | ४५ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | करळगाव, वडपाडा, ता.जि.पालघर |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता आशा मारवाडी यांचेमार्फत**

दिनांक ०२.०६.२०१८ रोजी संध्याकाळी ८.०० ते ८.३० वाजता करळगावच्या स्टॉप येथे अपघात झाला होता. त्यावेळी मी घरी होतो. त्यावेळी माझी पत्नी निर्मला ही गावाच्या दुकानावर रॉकेल आणण्याकरीता गेली होती. त्याच वेळी ती घरी धावत आली आणि तिने मला सांगितले की, सुरेश याचा अपघात करळगाव नाक्यावर मेन-रोडवर झाला आहे. त्यानंतर मी लगेचच घटनास्थळी गेलो. तेथे सुरेश हा ग्रामपंचायतच्या समोर रक्तामध्ये रोडवर पडला होता. तेथील गावातील लोकांनी पोलीस स्टेशन येथे फोन केला आणि घटनेची माहिती दिली. तेथे मला माहिती पडले की, ८.१५ ते ८.३० वाजेच्या दरम्यान मनोर कडून वाडयाला जाणारी मोटरसायकल जिचा हेडलाईट बंद होता आणि ती भरधाव वेगाने आली आणि सुरेश हा रोड क्रॉस करत असतांना त्या मोटरसायकलने सुरेश यास जोराची धडक दिली. सुरेश याच्या डोक्याला, तोंडाला, हाताला, पायाला आणि शरीरावर जखम होत्या. पोलीसांनी सुरेश यास ग्रामीण रुग्णालयामध्ये घेवून गेले. डॉक्टरांनी सुरेश याला तेथे तपासून मयत घोषित केले. आम्ही मनोर सरकारी दवाखान्यात असतांना आम्हाला असे समजले की, सदरच्या मोटरसायकल चालक अविनाश जाधव राहणार हमरापुर हा सुध्दा जखमी असल्याने त्याला सुध्दा तेथेच दवाखान्यामध्ये उपचाराकरीता आणले होते. त्यावेळी मोटरसायकलवर अविनाश सोबत आणखी दोघे जण असल्याचे आम्हाला माहिती पडले होते. पण त्या दोघांचे नावे मला माहिती नाही. त्यानंतर मी मनोर पोलास ठाणे येथे या

घटनेबाबत फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्याद दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीस **निशाणी पी-१** देण्यात येते. आता मला सदर प्राथमिक खबर अहवाल दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर प्राथमिक खबर अहवालास **निशाणी पी-२** देण्यात येते. पोलीसांना मी घटनास्थळ सुध्दा दाखवले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी करीता विद्वान वकील यांचा वारंवार ०५.४५ वाजेपर्यंत पुकारा केला असता गैरहजर.**
**आरोपी यांचा ०५.४५ वाजेपर्यंत पुकारा केला असता गैरहजर.**
**वरील साक्षीदाराचा साक्षीपुरावा फौ.प्र.सं. कलम ३०९ प्रमाणे नोंदविण्यात आला.**
**आरोपी व त्यांचे वकील गैरहजर असल्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश.**

समक्ष,

GAJBHIYE YOGESH HARIDAS
Digitally signed by GAJBHIYE YOGESH HARIDAS
Date: 2025.10.09 14:48:44 +0530

(यो. ह. गजभिये)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.४, पालघर
दिनांक : ०७.१०.२०२५

श्रवणोत्तर स्विकृत,

GAJBHIYE YOGESH HARIDAS
Digitally signed by GAJBHIYE YOGESH HARIDAS
Date: 2025.10.09 14:48:49 +0530

(यो. ह. गजभिये)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.४, पालघर